# येशू आणि शोमरोनी–पिकलेली शेते

## आम्ही सर्व वंशातील लोकांना शिष्य करावे अशी येशूची आज्ञा आहे

*मुलांना शिकवणाऱ्यांनी R5b ह्या अभ्यास वाचावा.*

**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू तुझी सुवार्ता आमच्या मंडळीने कोणत्या दुर्लक्षित लोकगटांना जाऊन सांगावी आणि तिकडे आम्ही कोणाला पाठवावे याबद्दलची तुझी इच्छा कृपा करून आम्हांला कळव.''*

**१. तुमच्या मंडळीच्या जवळच असणारी ''पिकलेली शेते'' पाहण्यास तुमच्या अंत:करणाची तयारी करा. येशू आणि शोमरोनी**



**योहान ४:४-२६** *हा शास्त्रभाग वाचून ह्या प्रसंगाची पार्श्वभूमी समजून घ्या.*

**योहान ४:२७-४२** *हा शास्त्रभाग वाचून थोडके विश्वासणारे असणाऱ्या लोकगटांकडे पाहण्याचा येशूचा दृष्टिकाण कसा होता ते पाहा.*

**सूचना:** *येशू आणि त्याचे शिष्य हे यहूदी वंशातील होते. त्या काळात यहूदी लोकांच्या दृष्टीने शोमरोनी लोक हे अशुद्ध. अस्पृश्य असे होते.*

*पुढील गोष्टींचा तपशील* **पाहा.**

*अ) वचने* **२७ व ४०,** *इतर लोक शोमरोनी लोकांचा तिरस्कार करीत त्यांना येशूने कशी वागणूक दिली?*

*ब) वचन* **३५,** *येशूने आपल्या शिष्यांना शोमरोनी लोकांशी कसे वागायला सांगितले.*

*क) वचन* **४१,** *शोमरोनी लोकांनी येशूवर विश्वास का ठेवला?*

*(उत्तरे:*

*अ) तो त्यांच्याशी बोलला, त्यांच्याशी प्रेमाने वागला आणि काही दिवस त्यांच्याबरोबर राहिला.*

*ब) पिकून तयार झालेली शेते.*

*क) कारण येशूचे स्वतःचे शब्द )*

### इतर वांशिक गटांसंबंधात येशूची आमच्याकरीता सर्वोच्च आज्ञा.

**मत्तय २८:१६-२० ह्या वचनांत पाहा:**

*अ) वचन १८ मध्ये, आपली सुवार्ता कोठे पसरली जावी अशी येशूची इच्छा आहे.*

*ब) वचन १९ व २० मध्ये, प्रत्येक लोकगटातील नव्या शिष्यांसाठी आम्ही काय करायचे आहे.*

*क) वचन २० मध्ये, इतर वंशाच्या लोकांकडे आम्ही विश्वासणाऱ्यांनी किती काळ सुवार्ता सांगायला गेले पाहिजे.*

*(उत्तरे:*

*अ) प्रत्येक वांशिक गटाकडे.*

*ब) त्यांना बाप्तिस्मा द्य व त्यांना येशूचे आज्ञापालन करायला शिकवा, अगदी आपण आपल्या स्वतःच्या लोकांशी वागलो तसे वागा.*

*क) युगाच्या समाप्ती पर्यन्त, येशू परत येईल तो पर्यन्त).*

*देवाच्या लोकांनी जाऊन सुवार्ता सांगितली पाहिजे अशी* **चार ठिकाणे आहेत.** *आपल्या शिष्यांनी—अनुयायांनी कोठे जावे अशी येशूने आज्ञा दिली आहे ते* **प्रे.कृ.१:६-११** *मध्ये पाहा.*



*अ) नवे शिष्य करण्यास आम्ही कोठून सुरुवात करावी?*

*ब) मग आम्ही कोठे गेले पाहिजे?*

*क) त्यानंतर आम्ही कोठे गेले पाहिजे?*

*ड) शेवटी आम्ही कोठे गेले पाहिजे?*

*(उत्तर (वचन ८ मध्ये):*

*अ) यरूशलेम म्हणजे आमचे स्वतःचे गाव आणि वांशिक गट.*

*ब) यहूदीया म्हणजे इतर गावांमध्ये असणारे आमच्या वंशाचे गट.*

*क) शोमरोन म्हणजे अन्य वंशाचे गट, आमच्या स्वतःच्या लोकांजवळ राहणारे व त्यांच्यासारखेच लोक.*

*ड) 'पृथ्वीच्या शेवटापर्यन्त' याचा अर्थ कोणत्याही राष्ट्रातील कोणतेही दुर्लक्षित वांशिक गट.)*

**आम्ही येशूची सुवार्ता कोणत्या वंशाच्या गटांकडे न्यावी अशी त्याची इच्छा आहे.**

**सूचना** *'परराष्ट्रीय' यामध्ये सर्व यहूदीतर वंशांच्या गटांचा समावेश आहे.*

**रोम.१५:१४-२१ हया वचनात पाहा**

*अ) वचन १६ मध्ये अन्य वंशातील लोक कशामुळे देवाला ग्रहणीय होतात.*

*ब) वचन १८ व १९ मध्ये, आपल्याला अन्य वांशिक गटांना शिष्य करण्याचे सामर्थ्य कोठून मिळते.*

*क) वचन २० मध्ये, आम्ही नवे शिष्य करण्यासाठी कोठे गेले पाहिजे?*



**Samaritans**

*(उत्तरे:*

*अ) ते येशूवर विश्वास ठेवतात तेव्हा पवित्र आत्मा त्यांना पवित्र करतो.*

*ब) येशूकडून व पवित्र आत्म्याकडून.*

*क) जिथे लोकांचा अद्याप येशूवर विश्वास नाही.)*

**२. सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवड्यातील कार्यक्रमांची योजना आखा (तुमच्या लोकांच्या जवळ राहणाऱ्या दुर्लक्षित) वांशिक गटांचा शोध घ्या.**

*या दुर्लक्षित लोकांची सेवा करण्यासाठी व त्यांना सुवार्ता सांगण्यासाठी तुमच्या मंडळीने काय करावे याकरीता एकत्रितपणे* **प्रार्थना करा.**

*या वांशिक गटातील व्यक्तींची* **भेट घेऊन** *त्यांच्या भौतिक व आध्यात्मिक गरजा समजावून घ्या तसेच त्यांच्याशी मैत्री करा.*

*इतर राष्ट्रांमधील दुर्लक्षित वांशिक गटांची* **माहिती करून घ्या.** *आणि ही माहिती संकलित करून ती मंडळीला उपलब्ध करून द्या.*

**३. सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासना सभे विषयी योजना आखा.**

**मुलानी,** *विहिरीवरील शोमरोनी स्त्री ह्या वृत्तांताचे नाटयीकरण करून, त्यांनी तयार केलेले प्रश्न मोठ्या माणसांना विचारावेत.*

**वृत्तांत सादर करा** *तुमचे आठवडाभरातील शिक्षण.*

**प्रार्थना करा** *दुर्लक्षित वांशिक गट आणि त्यांना सुवार्ता सांगण्याचा प्रयत्न करणारे मिशनरी सेवक. पवित्र आत्म्याला विनंती करून तुमच्या मंडळीला प्रेषित देण्याची विनंती करा. म्हणजे त्यांना दुर्लक्षित लोकांच्या गटाकडे पाठवता येईल आणि तुमची मंडळी तिथे सुरु करता येईल.*

**प्रभु भोजनाची** *ओळख करून देण्यासाठी यशया. ५२:१३ ते ५३:९ हा शास्त्रभाग वाचा. प्रभू येशूची अशी इच्छा आहे की, त्याचे तारण प्रत्येक राष्ट्रातील सर्व वंशांच्या गटांपर्यन्त पोचावे आणि हजारों वंशांच्या गटांतील विश्वासणाऱ्यांनी आपण होतो तसेच एकाच वेळी प्रभुभोजन घ्यावे, हे समजावून सांगा.*

**पाठ करा** *योहान ४:३५, हे वचन आपल्याला पिकून तयार झालेल्या शेताबद्दल सांगते.*

**प्रार्थना:** *''स्वर्गीय पित्या, आमचे तारण व्हावे म्हणून मरण पावलेला आणि पुन्हा उठलेल्या येशू तू आम्हांस दिला याबद्दल आम्ही तुझे आभार मानतो. ही सुवार्ता दुर्लक्षित लोक आणि इतर वंशांचे गट हयांच्याकडे घेऊन जाण्यास आमचे सहाय्य कर.''*



Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net